**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १० नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **नवी दिल्ली इथं सहकारिता महाकुंभ २०२५ परिषदेचं केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन.**
2. **राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात.**
3. **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत इतर पक्षांसोबत आघाडी करण्याचा निर्णय स्थानिक पातळीवर घेण्यात येत असल्याची काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची माहिती.**
4. **रेशीमबाग मैदान इथं २२ ते ३० नोव्हेंबर दरम्यान नागपूर पुस्तक महोत्सवाचं आयोजन.**

---------------------------------------------------

सहकारिता/ महाकुंभ २०२५

देशातल्या दोन लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या प्रत्येक शहरात येत्या पाच वर्षांत किमान एक नागरी सहकारी बँक असली पाहिजे, असं उद्दिष्ट ठेवावं, असं आवाहन केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी आज केलं. नवी दिल्ली इथं आज सहकारिता महाकुंभ-२०२५ या, शहरी सहकारी कर्जासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. या दोन दिवसीय परिषदेत धोरण, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यावर सखोल मंथन व्हावं आणि परिषदेच्या शेवटी प्रसिद्ध होणाऱ्या जाहीरनाम्यात सहकार क्षेत्रासमोरच्या अडचणी सोडवण्याचे उपाय आणि कालबद्ध कार्यक्रम असावा, जेणेकरून शहरी सहकारी बँकांच्या विस्ताराचं स्वप्न लवकरच पूर्ण होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमात शहा यांनी सहकार डिजी पे आणि सहकार डिजी लोन या दोन डिजिटल मंचांचा प्रारंभही केला. या दोन मंचांचा मोठा फायदा सहकारी बँकांना होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

***(होल्ड बाईट- अमित शहा - ३६ सेकंद)***

देशातल्या सहकारी संस्था मजबूत करण्यासोबतच वंचितांना वर आणण्याचं ध्येय सहकार मंत्रालयानं ठेवलं असल्याचं शहा यांनी सांगितलं.

-----------------------------------------------

निर्मला सीतारामन

आगामी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७च्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज अर्थतज्ज्ञांसोबतची पहिली बैठक घेतल्याची माहिती अर्थमंत्रालयाने समाजमाध्यमाद्वारे दिली. अर्थमंत्रालयाच्या अर्थ व्यवहार विभागाचे सचिव, केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही.अनंत नागेश्वरन आणि वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. यानंतर अर्थमंत्री, कृषी क्षेत्रातल्या तज्ज्ञांसोबत आणि शेतकरी संघटनांसोबत बैठक घेणार आहेत.

-----------------------------------------------

उमेदवारी अर्ज

राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली आहे. १७ नोव्हेंबरपर्यंत हे अर्ज भरता येतील. अर्जांची छाननी १८ नोव्हेंबर रोजी होणार आहे. अर्ज मागे घेण्याची शेवटी मुदत २१ नोव्हेंबर ही असून उमेदवारांची अंतिम यादी २६ नोव्हेंबर रोजी जाहीर केली जाणार आहे. या निवडणुकीत एकंदर १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार, ६ हजार ८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड करतील. निवडणुकीसाठीचं मतदान २ डिसेंबर रोजी, तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी होणार आहे.

-----------------------------------------------

विजय वडेट्टीवार

मुंबई महानगरपालिका निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार असल्याची घोषणा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज केली. ते नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. नाशिकमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि महाविकास आघाडीनं एकत्र निवडणूक लढवायचा निर्णय स्थानिक पातळीवरच्या नेत्यांनी तिथली राजकीय परिस्थिती बघून घेतला असून तसे सर्व अधिकार त्यांना दिलेले आहेत, असं त्यांनी सांगितलं.

***(होल्ड बाईट- वडेट्टीवार - ३० सेकंद)***

भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना सोडून इतर कोणत्या पक्षांसोबत आघाडी करावी, याचा निर्णय स्थानिक पातळीवर सोडला असल्याचं त्यांनी सांगितलं. निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर देखील त्यांनी यावेळी प्रश्नचिन्ह उभे केले. पुण्यातील कोरेगाव प्रकरण जनतेसमोर आल्यामुळे तो व्यवहार रद्द झाला. मात्र व्यवहार रद्द झाला म्हणजे चोरी झाली नाही अस होत नाही. त्यामुळे या

प्रकरणी पार्थ पवारवर कारवाई झालीच पाहिजे अशी मागणी देखील वडेट्टीवार यांनी यावेळी केली.

----------------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

दरम्यान महाराष्ट्रात महायुतीची चाचपणी अंतिम टप्प्यातअसून महायुतीचाच मार्ग योग्य आहे. मात्र महायुती शक्य नसलेल्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत घेताना मतभेद आणि मनभेद होणार नाहीत याची खबरदारी घेण्याच्या सूचना कार्यकर्त्यांना दिल्या असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. त्यांनी आज नागपुरात प्रसार माध्यमांशी संवाद साधला. महाराष्ट्रात महायुतीबाबत प्रचंड उत्साह असून ५१ टक्के मत मिळवून महायुती विजयी होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

----------------------------------------------

आयआयआयटी नागपूर

ट्रिपल आय टी चा पाचवा पदवीप्रदान समारंभ उद्या सकाळी ११:०० वाजता व्हीएनआयटी सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या पदवीदान समारंभाला मुख्य अतिथी म्हणून अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेचे अध्यक्ष प्रा.टी.जी. सीताराम उपस्थित राहणार आहेत. या पदवीप्रदान समारंभात २०२१-२०२५ बॅचच्या विद्यार्थ्यांना एकूण ४३१ पदवी प्रदान केल्या जाणार आहे. यात बी.टेक, पदव्युत्तर डिप्लोमा, एम.टेक आणि पीएच. डी. चा समावेश असेल. तसेच ट्रिपल आय टी नागपूरकडून गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यासाठी दोन पुरस्कार प्रदान केले जातील.

----------------------------------------------

राष्ट्रपती

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू कालपासून अंगोलाच्या दौऱ्यावर आहेत. अंगोलाचे राष्ट्रपती जोआओ लोरन्को यांच्याशी काल त्यांची विविध क्षेत्रांत द्विपक्षीय सहकार्य आणखी मजबूत करण्यावर विस्तृत चर्चा झाली. ऐकुया यावर आधारित हा विशेष रिपोर्ट -

***(होल्ड बाईट - अंगोला ३४ सेकंद)***

आपल्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रपती बोत्सवाना देशाला भेट देणार आहेत.

----------------------------------------------

नागपूर पुस्तक महोत्सव

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय अंतर्गत राष्ट्रीय पुस्तक न्यास यांच्या वतीन शहरातील रेशीम बाग मैदान इथं दिनांक २२ ते ३० नोव्हेंबर दरम्यान नागपूर पुस्तक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ स्वायत्त शैक्षणिक विभाग, संचालित तसेच संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, रासेयो समन्वयक तसेच ग्रंथपालांच्या आज झालेल्या ऑनलाईन बैठकीत कुलगुरू डॉ.माधवी खोडे चवरे यांनी सर्वांना या महोत्सवात सामील होण्याचं आवाहन केलं. वाचन संस्कृतीत वाढ व्हावी यासाठी नागपूर पुस्तक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं असून ३२५ स्टॉल्स वर १५ लाख पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहेत.

----------------------------------------------

महापारेषण

वर्ल्ड इनोव्हेशन अँड चेंज मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या वतीने महापारेषण अर्थात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीला 'पीआरओ पीआर ग्लोब सोशल रिस्पॉन्सिबिलिटी कम्युनिकेशन अचिव्हमेंट अवॉर्ड्स-२०२५' या आंतरराष्ट्रीय पुरस्कारांतर्गत सन्मान जाहीर झाला आहे. या पुरस्काराचं वितरण २८ जानेवारी २०२६ रोजी इटलीतील रोम शहरात होणाऱ्या पीआरओ पीआर रोमन फोरम या आंतरराष्ट्रीय परिषदेत होणार आहे. या वर्षी सहा खंडांतील एकूण ७६ आंतरराष्ट्रीय परीक्षकांनी विविध संस्थांच्या संवाद, सामाजिक उत्तरदायित्व आणि जनसंपर्क प्रकल्पांचं मूल्यांकन केलं. त्यामध्ये महापारेषणला 'सोशल रिस्पॉन्सिबिलिटी कम्युनिकेशन अचिव्हमेंट' या श्रेणीत जगातील अव्वल तीन संस्थांमध्ये स्थान मिळालं आहे.

----------------------------------------------

विपश्यना केंद्र

2047 मधील विकसित भारताचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी संस्कारक्षम पिढी तयार करणे आवश्यक आहे. विपश्यना केंद्राच्या माध्यमातून या कामाला गती मिळणार आहे. त्यासाठी विपश्यना केंद्राने संस्कारक्षम पिढी तयार करावी, असं आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं . सृजनशील शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक सेवा मंडळातर्फे उभारण्यात येणाऱ्या कोंडेश्वर रोड इथल्या बोधीभुमि संस्कार केंद्राचा पायाभरणी सोहळा आज पार पडला. यावेळी आमदार रवि राणा, केवलराम काळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, कमलताई गवई, किर्ती गवई, रविराज देशमुख आदी उपस्थित होते.

-----------------------------------------------

"संविधान- एक चित्रात्मक अभिव्यक्ती

केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर' तर्फे 10 ते 14 नोव्हेंबर दरम्यान "संविधान - एक चित्रात्मक अभिव्यक्ती" या प्रदर्शनाचे आयोजन दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतीक केंद्र, नागपूरच्या सभागृहात करण्यात आल आहे. या विशेष प्रदर्शनाच उद्‌घाटन राज्य माहिती आयुक्त (नागपूर विभाग) गजानन निमदेव, आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतीक केंद्र नागपूरच्या संचालिका आस्था कार्लेकर यांच्या हस्ते करण्यात आल. भारतीय संविधानाच्या 75 व्या वर्धापन दिनानिमित्त देशभरात साजरा होणाऱ्या संविधानाच्या अमृत महोत्सवाचा भाग म्हणून हे प्रदर्शन आयोजित करण्यात आल आहे.

-----------------------------------------------

हवामान

राज्यात आता थंडीची चाहूल लागली असून अनेक जिल्ह्यांत हंगामातल्या नीचांकी तापमानाची नोंद झाली आहे. विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमध्ये किमान तापमान 11 ते 15 दशांश अंश सेल्सियस दरम्यान आहे. मागील 24 तासांत सर्वात कमी किमान तापमानाची नोंद गोंदिया इथं झाली. अकरा पूर्णांक पाच दशांश अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान गोंदियात नोंदवलं गेलं.

-----------------------------------------------